# मंत्रिमंडळ निर्णय

## ७ जुलै २०१४

## ( मंत्रिमंडळ बैठक क्र.१७३)

| क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | राज्यातील पथकराच्या सुधारित धोरणास (टोल पॉलिसी) मान्यता : २०० कोटींपेक्षा कमी खर्चाचे रस्ते खाजगीकरणातून नाही | सार्वजनिक बांधकाम |
| २ | पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव | उच्च व तंत्रशिक्षण |
| ३ | रमाई घरकूल योजनेत अनुदानात एक लाख रुपयांपर्यंत वाढ | सामाजिक न्याय |
| ४ | केंद्र-राज्य संबंध आयोगाच्या शिफारशी पायाभूत सुविधांवरील अभिप्राय केंद्राला पाठविणार | सामान्य प्रशासन |
| ५ | ऐतिहासिक स्मारकांच्या संगोपनासाठी आता १० वर्षाचे पालकत्व घेता येईल | सांस्कृतिक कार्य व पर्यटन |
| ६ | विदर्भातील नझूल जमीनींच्या भाडेपट्टा नूतनीकरणात सुधारणा | महसूल |
| ७ | पाणी टंचाईचा मुकाबला करण्यासाठी शासन सज्ज राज्यात केवळ २४ टक्के पाऊस | मदत व पुनर्वसन |

## राज्यातील पथकराच्या सुधारित धोरणास (टोल पॉलिसी) मान्यता

## २०० कोटींपेक्षा कमी खर्चाचे रस्ते खाजगीकरणातून नाही

राज्यातील पथकराच्या सुधारित धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. अर्थसंकल्पातून पूर्ण करण्यात येणा-या रस्त्यांच्या प्रकल्पांवर पथकर शुल्काची आकारणी करण्यात येणार नाही, तसेच यापुढे २०० कोटी रुपयांखालील प्रकल्प खाजगीकरणांतर्गत करण्यात येणार नाहीत. एसटी महामंडळाच्या बसगाड्यांना टोलमधुन वगळण्यात आले आहे.

यापूर्वी २७ जून २००० रोजी पथकर धोरण प्रसिध्द करण्यात आले होते. त्यानंतर हे धोरण ९ जानेवारी २००३ व ३० जुलै २००९ रोजी सुधारीत करण्यात आले होते.

### पथकर शुल्क

भविष्यातील प्रकल्पांसाठी पथकर शुल्काचे दर केंद्र शासनाच्या धोरणानुसार कि.मी. तत्वावर आधारित राहतील. वळण रस्त्याची किंमत दहा कोटी रुपयांपेक्षा जादा असल्यास रस्त्याच्या दराच्या १.५ पट एवढे पथकर शुल्क असेल. द्रुतगती महामार्गासाठीचे पथकर शुल्क १.२५ पट इतके असेल. ज्या भागाचे सहापदरी महामार्गात उन्नतीकरण करावयाचे आहे, त्यासाठी पथकर दर ७५ टक्के इतके काम पूर्ण होईपर्यंत असतील. दुपदरीकरण करावयाच्या रस्त्यासाठी पथकराचे दर चौपदरी रस्त्याच्या ६० टक्के इतके असतील.

वाहतूक वर्दळ डिजिटल पध्दतीने प्रशासकीय मान्यतेपूर्वी किमान सहा महिने व प्रशासकीय मान्यतेनंतर सलग सहा महिने घेण्यात येईल. निविदा निश्चितीपर्यंत सलग वाहतूक वर्दळ घेण्यात येईल. पूर्ण सवलत कालावधीकरीता वाहन गणती घेण्यात येईल.

### एसटी बसेसना सूट

वाहतूकदारांना कुपन्स, परतीचा पास, दैनिक पास, मासिक पासआणिस्थानिक पास (५ कि.मी. मधील वाहतूकदारांकरीता) अशा प्रकारच्या सवलती देण्यात येतील. तसेच एसटी बसेसला पथकर शुल्कातून सुट देण्यात येईल.

एकाच रस्त्यावरील दोन पथकर नाक्यांमधील अंतर ४५ कि.मी. दोन वेगवेगळ्या रस्त्यावरील दोन पथकर नाक्यांमधीलअंतर २०कि.मी. पेक्षा कमी नसावे.

### पथकर स्थानकांवर प्रवाशांसाठी सोयी

पथकर स्थानकांवर नवीन प्रकल्पाकरीता वाहतूकदारांना विविध प्रकारच्या सोयी सुविधा जसे स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, वाहनतळ, माहिती फलक, C.C.T.V. कॅमेरे, पोलीस चौकी, वजन काटा इ. पुरविण्यात येईल.

## सवलती

१. ५० कूपन्सची पुस्तिका आगावू खरेदी करणा-यास एकूण शुल्कामधून १० टक्के सवलत देण्यात येईल.

२. १०० कूपन्सची पुस्तिका आगावू खरेदी करणा-यास एकूण शुल्कामधून २० टक्के सवलत देण्यात येईल.

३. वारंवार प्रवास करणा-या वाहनांसाठी परतीच्याव दैनंदिन पासाचे दर हे त्या वाहनाच्या एकेरी प्रवास दराच्या अनुक्रमे दीडपट व अडीच पट राहतील (हे पास चोवीस तासांसाठी वैध राहतील.)

४. मासिक पासाचे दर एकेरी प्रवास दराच्या ५० पट राहतील.

५. मासिक पास तो दिल्याच्या दिनांका पासून ३० दिवसांसाठी वैध राहिल

६. मासिक पासाची सवलत स्थानिक वाहतुकीसाठी पथकर स्थानकांपासून ५ कि.मी.च्या परिघातील वाहनांना (मोटार, जीप, व्हॅन अथवा हलकी मोटर वाहने) देण्यात येईल व या पासाचा दर त्या वाहनाच्या एकेरी प्रवास दराच्या १० पट असेल व ही सवलत खालील अटीस अधीन राहून असेल.

७. वाहनाच्या मालकाने त्याच्या वास्तव्यासंदर्भात तहसीलदाराने दिलेले प्रमाणपत्र किंवा रेशन कार्ड अथवा निवडणूक ओळख पत्र अथवाआधार कार्डाद्वारे वास्तव्याचा पुरावा देणे आवश्यक राहील.

## पथकरातून सूट

१. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यांचे राज्यपाल, वाहनांवर लालदिवा अनुज्ञेय असलेले लोकप्रतिनिधी यांसारख्या आणि अतिमहत्वाच्या व्यक्ती प्रवास करीत असलेली वाहने.

२. लोकसभा व राज्यसभेचे विद्यमान सदस्य तसेच महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधान परिषदेचे विद्यमान सदस्य प्रवास करीत असलेली वाहने.

३. महाराष्ट्रातील माजी संसद सदस्य व महाराष्ट्र वि.स. किंवा महाराष्ट्र वि.प.चे माजी सदस्य प्रवास करीत असलेली वाहने

४. राज्याच्या दौ-यावर असलेल्या महत्वाच्या परदेशी व्यक्ती (on reciprocal basis country wise concession for consulate)

५. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवासी बसेस

६. केंद्र व राज्य शासनाची वाहने

७. पोलीस वाहने

८. लष्करी वाहने

९. पोस्ट व तार विभागाची वाहने

१०. रुग्णवाहिका

११. शव वाहिका

१२. अग्निशमन दलाची वाहने

------o-----

## पुणे विद्यापीठाला
## सावित्रीबाई फुले यांचे नाव

पुणे विद्यापीठाचे नामकरण करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला असून आता या विद्यापीठाचे नाव “सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ” असे राहील.

सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आणि विचारांचा आदर्श भावी पिढीसमोर ठेवण्यासाठी पुणे विद्यापीठाचे नामकरण करणे अशी मागणी राज्यातील विविध मान्यवर आणि संस्थांनी केली होती. याला अनुसरुन पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत पुणे विद्यापीठाचा नामविस्तार करण्याचा ठराव संमत झाला आणि त्याला विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांची मान्यता मिळाली.

शिक्षणापासून हजारो वर्षे वंचित असणाऱ्या समाजास महात्मा फुले यांनी शिक्षणाची दारे खुली करून भारतातील गुलामगिरी, वर्णभेद, धर्मभेद यांच्या निर्मुलनासाठी आपले आयुष्य वेचले. १८४८ साली त्यांनी भारतात मुलींची पहिली शाळा सुरु केली.  समाजाच्या विरोधामुळे शिक्षक मिळणे कठीण झाल्यामुळे त्यांनी आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिकवून शिक्षिका केले.  सावित्रीबाई वयाच्या १७ व्या वर्षी देशातील पहिल्या शिक्षिका झाल्या आणि खऱ्या अर्थाने स्त्री शिक्षणाचा प्रारंभ झाला.

-----o-----

सामाजिक न्याय

## रमाई घरकूल योजनेत अनुदानात एक लाख रुपयांपर्यंत वाढ

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या रमाई आवास (घरकूल) योजनेत ग्रामीण भागातील घरकूल अनुदानात ७० हजार रुपयांवरुन एक लाख रुपये इतकी वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

नगर परिषद क्षेत्रासाठी हे अनुदान एक लाख ५० हजार तर महानगरपालिका व मुंबई महानगर क्षेत्रासाठी ही मर्यादा दोन लाख रुपये एवढीच राहील.

ही योजना सुरु झाल्यापासून आजपर्यंत एकूण २ लाख ९२ हजार ८८६ घरकुलांचे उद्दिष्ट होते.  त्यापैकी एक लाख ९२ हजार १९६ घरकुले मंजूर करण्यात आली आहेत.  ही योजना ग्राम विकास विभागाच्या इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर राबविण्यात येत असून या योजनेतील अनुदानात गेल्या वर्षीच एक लाख रुपयांपर्यंत वाढ करण्यात आल्याने रमाई घरकुलांच्या बाबतीत देखील हा निर्णय घेण्यात आला.

तसेच शबरी आदिवासी घरकूल योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या रमाई घरकूल योजनेप्रमाणे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेद्वारे तसेच नगरपरिषद व महानगरपालिकेद्वारे राबविण्यास मान्यता देण्यात आली.

-----o-----

सामान्य प्रशासन

## केंद्र-राज्य संबंध आयोगाच्या शिफारशी
## पायाभूत सुविधांवरील अभिप्राय केंद्राला पाठविणार

केंद्र- राज्य संबंध आयोगाच्या शिफारशींवर पायाभूत सुविधांमधील बंदरे आणि भूसंपादन विषयक दोन मुद्यांवर राज्य शासनाचे अभिप्राय केंद्राला पाठविण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

यापूर्वी म्हणजेच मे २०१४ मधील मंत्रिमंडळ बैठकीत २८० शिफारशींचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता, त्यावेळी २७८ शिफारशींवर चर्चा करून या शिफारशी केंद्राला पाठविण्यात आले. उर्वरित दोन मुद्यांवर आज निर्णय घेण्यात आला.

-----o-----

पर्यटन व सांस्कृतिक कार्य

## ऐतिहासिक स्मारकांच्या संगोपनासाठी आता
## १० वर्षाचे पालकत्व घेता येईल

राज्यातील संरक्षित स्मारके व ऐतिहासिक वारशांचे संगोपन करण्यासाठी आता १० वर्षे पालकत्व घेता येईल असा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. यापूर्वी हा कालावधी पाच वर्षाचा होता.

२००७ मध्ये महाराष्ट्र वैभव ६ राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजना सुरु करण्यात आली. या योजनेत सर्वसामान्य व्यक्ती, संस्था यांना एखादे स्मारक पाच वर्षाच्या कालावधीकरिता देण्याची तरतूद आहे. मात्र, या योजनेस माफक प्रतिसाद मिळाला. स्मारकाचे संगोपन केल्यानंतर त्याची देखभाल, दुरुस्ती व सुशोभीकरण यासाठी केलेला खर्च पाच वर्षात भरून निघणार नाही, त्यामुळे हा कालावधी वाढवून १० वर्षाचा करण्याचे ठरले.

-----o-----

# विदर्भातील नझूल जमीनींच्या भाडेपट्टा नूतनीकरणात सुधारणा

विदर्भातील लोकांचा जिव्हाळ्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीकोनातून नझूल जमिनींच्या भाडेपट्टयाच्या नूतनीकरणाच्या धोरणात काही महत्वपूर्ण सुधारणा करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयांमुळे सुमारे ३६,७९१ नझूल भाडेपट्टेधारकांना भाडे पट्टयाचे नूतनीकरण करणे व शर्तभंग नियमानुकूल करणे याबाबत मोठा दिलासा मिळणार आहे.

नागपूर व अमरावती या महसूल विभागातील शासकीय जमिनींना नझूल जमीन असे संबोधले जाते. या शासकीय जमिनी स्वातंत्र्यपूर्व काळात भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या आहेत. या नझूल जमिनींच्या भाडेपट्टयाचा नूतनीकरणाचा प्रश्न गेली अनेक दशके प्रलंबित होता. हा निर्णय फक्त नागपूर, अमरावती विभागातील नझुल जमिनींनाच लागू होणार आहे.

**शर्तभंग प्रकरणे नियामानुकूल करणार**

अनधिकृत हस्तांतरण व वापरात बदल असे दोन्हीही प्रकारचे शर्तभंग झालेली प्रकरणे नियमानुकूल करण्यासाठी यापुर्वी जमिनीच्या प्रचलित बाजारमूल्याच्या २५ % अनर्जित रक्कम आकारण्याची तरतूद होती. त्याऐवजी आता प्रत्येक प्रकारच्या शर्तभंगाबाबत,असा शेवटचा शर्तभंग झालेल्या दिनांकास असलेले जमीनीचे बाजारमुल्य आकारुनहे दोन्ही शर्तभंग नियमानुकुल करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

अ) अनधिकृत हस्तांतरणाबाबत नोंदणीकृत दस्तावेज उपलब्ध नसल्यास, अशा दस्तावेजाची प्रथमतः नोंदणी करण्यात यावी व नोंदणी केलेल्या दिनांकास असलेल्या जमीनीच्या बाजारमुल्याच्या २५% अनर्जित उत्पन्न आकारण्यात यावे.

ब) अनधिकृत वापरात बदलास स्थानिक नियोजन प्राधिकरणाची मान्यता प्राप्त असणे आवश्यक आहे. यामध्ये जर संबंधित भाडेपट्टाधारकाकडे वापरातील बदलाबाबत शॉप लायसेन्स, गुमास्ता लायसेन्स व इतर संवैधानिक दस्ताऐवज उपलब्ध असेल तर तो वैध पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

**भाडेपट्टा करारामध्ये हस्तांतरणाची मुभा**

हस्तांतरण अनर्जित उत्पन्न भरण्याच्या सवलतीसह नियमानुकूल करण्याची तरतूद “भाडेपट्टा करारामध्ये हस्तांतरण करण्यासाठी मुभा देणारी अट समाविष्ट असेल **व** भाडेपट्टा हक्क खुल्या लिलावात घेतले असतील” अशाच प्रकरणांना लागू होती. म्हणजेच वरील दोन्ही बाबींची पूर्तता करणारी प्रकरणेच अनर्जित उत्पन्नाच्या सवलतीसाठी पात्र ठरत होती. परंतु आता अनर्जित उत्पन्न भरण्याच्या सवलतीसह हस्तांतरण/वापरात बदल नियमानुकूल करण्याच्या प्रकरणांची व्याप्ती वाढविण्यात आली असून “भाडेपट्टा करारामध्ये हस्तांतरण करण्यासाठी मुभा देणारी अट समाविष्ट असेल **किंवा** भाडेपट्टयाचे हक्क खुल्या लिलावात घेतले असतील **किंवा** प्रिमियमवर घेतले असतील” अशा सर्व प्रकरणांखाली ही तरतूद लागू करण्यात आली आहे.

-----o-----

## पाणी टंचाईचा मुकाबला करण्यासाठी शासन सज्ज
## राज्यात केवळ २४ टक्के पाऊस

अपुऱ्या पावसामुळे निर्माण होत असलेल्या पाणी टंचाईचा मुकाबला करण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या १० हजार ५८० गावांमध्ये टंचाई जाहीर केली आहे. पाणी टंचाई निवारणार्थ राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांसाठी १६८ कोटी रुपये निधी सर्व विभागांना देण्यात आला आहे.

तात्पुरत्या आणि तातडीच्या उपाययोजना :-

१. नवीन विंधण विहिरी घेणे,
२. विहिरींचे खोलीकरण / गाळ काढणे
३. तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा योजना
४. नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती
५. विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती
६. खाजगी विंधन विहिरींचे अधिग्रहण
७. टँकरद्वारे पाणी पुरवठा

राज्यात ५ जुलैपर्यंत ६८.०२ मी.मी. म्हणजेच सरासरीच्या २३.६० टक्के पाऊस झाला आहे. सरासरीच्या तुलनेत पडलेला पाऊस पुढील प्रमाणे- ३५५ तालुक्यांपैकी २२० तालुक्यात ० ते २५ टक्के, ११५ तालुक्यात २५ ते ५० टक्के, १३ तालुक्यात ५० ते ७५ टक्के, ५ तालुक्यात ७५ ते १०० टक्के आणि २ तालुक्यात १०० टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**वीस जिल्ह्यात २५ टक्के पाऊस**

रायगड, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, कोल्हापूर, पुणे, औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलडाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ,गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांत सरासरीच्या तुलनेत ० ते २५ टक्के तर ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहमदनगर, सोलापूर, सातारा, लातूर, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, आणि गोंदिया या जिल्ह्यांत २५ ते ५० टक्के पाऊस झाला आहे. केवळ सांगली जिल्ह्यात ७५ टक्क्यांपर्यंत पाऊस झाला आहे.

**धरणात १८ टक्के पाणी साठा**

राज्यातील जलाशयात १८ टक्के साठा असून १५४९ टँकर्सद्वारे १४३९ गावांना आणि ३४६९ वाड्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. कोकण विभागात एकूण ५१, नाशिक विभागात ४६९, पुणे विभागात ३५७, औरंगाबाद विभागात ६१४, अमरावती विभागात ४४ आणि नागपूर विभागात १४ अशी टँकरची संख्या आहे. मागील वर्षी याच सुमारास २८९७ टँकर्स लावण्यात आले होते.

**पेरणी १० टक्के**

राज्यातील खरीपाचे सरासरी क्षेत्र १३४.७० लाख हेक्टर असून ५ जुलै पर्यंत १० टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे.

-----o-----